ISSN: 2249-894X

REVIEW OF RESEARCH


UGC APPROVED

International Online Multidisciplinary Journal

Volume - 8 | Issue - 3 | December - 2018

Impact Factor : 5.7631(UIF)

# भा. रा. तांबे आनंदवाद आणि प्रस्थान गीते



प्रा. डॉ. आनंद वसंत डुडूल

प्रा. डॉ. आनंद वसंत डुडूल

कला, विज्ञान व वाणिज्य महा. चिखलदरा, जि. अमरावती.

प्रस्तावना : तत्कालीन कवींच्या तुलनेत भा. रा. तांबेची प्रतिभा बहुप्रसवा ठरलेली आहे. त्यांनी दीर्घकाळ काव्यलेखन केले. त्यांच्या सव्वा दोनशेच्यावर काव्यरचना उपलब्ध आहेत. भा. रा. तांबे ...........

Editor - In - Chief - Ashok Yakkaldevi

International Online Multidisciplinary Journal
REVIEW OF RESEARCH
ISSN NO: 2249-894X

Review of Research (ROR) Journal is an Online International Multidisciplinary Research Journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the Editorial Board. Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## OUR CHIEF EDITORS

India




Ashok Yakkaldevi

Iran



Bijan Goodarzi

Bucharest



Ecaterina

Sri-lanka



Kamani Perera

## Associate Editors



Dr. T. Manichander



Sanjeev Kumar Mishra


## Associated and Indexed, India

- MENDALEY
- GOOGLE SCHOLAR
- CITULIKE
- ENDNOTE
- ZOTERO
- DRJI

International Online Multidisciplinary Journal

**Review of Research**

Save Tree, Save Paper, Save World

ISSN NO:- 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF) Vol.- 8, Issue - 3, December-2018


## Content


| Sr. No. | Title and Name of The Author (S) | Page No. |
|---|---|---|
| 1 | Life Satisfaction Of Teachers Working In Special Schools In The Southern Districts Of Tamilnadu<br>Ms. S. Shahila Rani and Dr. (Ms.) A. Joycilin Shermila | 1 |
| 2 | Choice And Responsibility: Existential Dimension Of Rohinton Mistry's *A Fine Balance*<br>Mr. C. Sathish Kumar And Dr. S. Leela | 5 |
| 3 | The Impact Of Knowledge Sharing Behaviour On Academic Performance Of Teaching Faculty Of Arts And Science Colleges<br>S. Sam Santhose and Dr. P. Ravi | 11 |
| 4 | Role Of Micro Small Medium Enterprise (MSME) Institute In Promoting Entrepreneurship In Sikkim<br>Dr. Pradip Kumar Das | 17 |
| 5 | Empowering Indian Citizen Through Digital India<br>Bhojraj Yashwant Shewale and Dr. Vani. N. Laturkar | 27 |
| 6 | Effectiveness Of Experiential Learning In Science At Diploma In Elementary Education<br>R. Subramanian and Dr. G. Singaravelu | 37 |
| 7 | A Study On Occupational Stress Among Primary Health Centre Nurses (PHC) In Chennai<br>S. Viswambaradevi and Dr. A. A. Ananth | 43 |
| 8 | Role Of Self Help Groups In Livelihoods Enhancement Among Women In Guntur District Of Andhra Pradesh<br>G. Prasada Rao and Dr.R.Srinivasu | 51 |

| | | |
|---|---|---|
| 9 | History Of Sri Iyarappar Temple At Thiruvaiyaru<br>Dr. K. Manivannan | 59 |
| 10 | Role Of Human Reserve Administration In Educational Organization<br>Dr. M. Kumaravelu | 67 |
| 11 | भा. रा. तांबे आनंदवाद आणि प्रस्थान गीते<br>प्रा. डॉ. आनंद वसंत डुडूल | 73 |
| 12 | गुजरात के दरिया किनारे पर विकसे हुए विहारधाम (प्रवासन संदर्भ में)<br>डॉ.हरेश के. पंचाल | 78 |

REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# LIFE SATISFACTION OF TEACHERS WORKING IN SPECIAL SCHOOLS IN THE SOUTHERN DISTRICTS OF TAMILNADU



Ms. S. Shahila Rani[1] and Dr. (Ms.) A. Joycilin Shermila[2]
[1]Ph.D., Research Scholar, Department of Education, Manonmaniam Sundaranar University, Abishekapatti, Tirunelveli , TamilNadu, India.
[2]Principal & Associate Professor of English , Annammal College of Education for Women, Thoothukudi .

**ABSTRACT**

*Special Education programs are designed for those students who are mentally, physically, socially and/or emotionally delayed. The special education teacher in today's schools plays a very critical role in the proper education of exceptional students. If the teachers have professional values and are satisfied with their teaching and life, they can do a lot to up-lift the standards of education in schools. The purpose of the study was to identify the life satisfaction of teachers working in special school in the Southern Districts of Tamilnadu. The present study has employed normative survey method. Life Satisfaction Scale prepared and validated by the investigator was used for measuring life satisfaction of teachers working in special schools. The tool consisted of 40 items from four selected areas of life satisfaction. The findings of the study revealed significant difference in marital status, nature of school among teachers. The study recommended the teachers working in special schools to attend in-service program that help them to regulate their emotions and control them in order to have a satisfied life.*

**KEYWORDS:** *Life satisfaction, Special school teachers, Marital status, Nature of school, Usage of computers.*

## INTRODUCTION

Special Education programs are designed for those students who are mentally, physically, socially and/or emotionally delayed. Special Education programs and services adapt content, teaching methodology and delivery instruction to meet the appropriate needs of each child. Special schools are using strategies such as assistive technology, accommodations, modification and paraprofessionals to help students receiving special education services succeed in general education settings.


The individualized education planning (IET) is often described as the cornerstone of special education. Special education teachers work with children and youth who have a variety of disabilities. The majority of special education teachers work with children with mild to moderate disabilities, using or modifying the general education curriculum to meet the child's individual needs and providing required remedial instruction. Most special education teachers instruct students at the preschool, elementary, middle, and secondary school level, although some work with infants and toddlers.

The special education teacher in today's schools plays a very critical role in the proper education of exceptional students. They posses' typical characteristics such as capacity for self-direction, patience and perseverance, experiment minded. The success of any educational programme depends upon the performance of the teacher. So if the teachers have professional values and are satisfied with their teaching and life, they can do a lot to up-lift the standards of education in schools.

Satisfied teachers concern themselves with subject matter, helping children to learn, influencing their life, character development and drawing personal satisfaction when students grow and achieve. Life at home and life at work are two important areas of a special education teacher that reciprocally influence one another. Life satisfaction of a special education teacher has been linked both to situation factors and personal factors.

IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
REVIEW OF RESEARCH
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# भा. रा. तांबे आनंदवाद आणि प्रस्थान गीते



प्रा. डॉ. आनंद वसंत डुडूल
कला, विज्ञान व वाणिज्य महा. चिखलदरा, जि. अमरावती.

**प्रस्तावना :**

तत्कालीन कवींच्या तुलनेत भा. रा. तांबेची प्रतिभा बहुप्रसवा ठरलेली आहे. त्यांनी दीर्घकाळ काव्यलेखन केले. त्यांच्या सव्वा दोनशेच्यावर काव्यरचना उपलब्ध आहेत. भा. रा. तांबे केशवसुतादी कवींपेक्षा भिन्न मनो असणारे कवी आहेत.

## आनंदवादी दृष्टिकोन

सश्रद्धता व त्यापोटी आलेली आशावादी दृष्टी त्यांच्या व्यक्तित्वातील प्रभावी घटक होते. अर्थात कवितेवरही ह्या घटकांचा प्रभाव पडणे अपरिहार्यच होते. तांब्यांची स्वतःची अशी एक कलादृष्टी होते. या कलादृष्टीमुळेच आशावादी नि सश्रद्ध असूनही त्यांची कविता बींच्या काव्यापेक्षा वेगळी ठरली. बीही आशावादी नि सश्रद्ध पण समाजन्मुख, प्रगमनशील. ताब्यांनी जीवनाला आनंदमय मानलेले होते.

I look upon the visible world as the expression of joy itself ------- it is its very essence, its very nature, sorrow is only foreign to it. [1]

हीच त्यांची मूळ श्रद्धा होती. विश्वात दुःख परके आहे. दुःख केवळ आभास आहे. It is in the shadow, not in the substance जीवनाचे सच्चिदानंद युक्त स्वरूप त्यांनी श्रद्धेने स्वीकारले.

त्यांच्या या जीवनदृष्टीतूनच त्यांची कलेची ल्हादैकमयता स्पष्ट करणारी दृष्टी घडली. त्यांब्यांनी कलेला विमुक्त मानले. तिच्यावर कसलेही बंधन दडपण असलेले नाकारले. कला ही कोणत्याही हेतूने निर्माण होत नाही. विशुद्ध आनंदनिर्मिती हेच तिचे ध्येय. वास्तव जगातील दुःखांकडे कलाकार वेगळ्याच दृष्टीने पाहतो. **वेलीच्या फुलांत जी न्यूनता असते, जे काटे बोचतात जे कृमिकीटकांचे भय असते. ते कलेच्या फुलांत नसते, इतकेच नव्हे तर वेलीच्या फुलांत जे तरंग ज्या भावना नसतात. त्या कलाकाराच्या फुलांत असतात. वास्तव जग जड असते.**

**तर कला मनोमय, चैतन्यस्वरुप असते. तिच्यात संपूर्ण नीती, संपूर्ण सत्य, संपूर्ण, सौंदर्य प्रकट होते. ती सर्वस्वी ल्हादैकमय होते.** [2] अशा चिंतनाने त्यांच्या कतितेचा मार्ग निश्चित झाला होता. जीवनातील आनदावरील अढळ विश्वासामागे त्यांची ईश्वरश्रद्धा बळकटपणे उभी होती. जगत हा प्रीतीचा फुलवरा, माधुर्यच माधुर्य भरे मन, माधुर्याविण काहिं न दुसरे हा त्यांचा अनुभव.

**चहुकडे तुझीच नाडी उडे
चहुकडे तुझेंच हसणे रडें,
नीट बघ, दूर पळे साकडे
स्वयें मृत्यु निज शस्त्र चरणिं तव अर्पिल करूनी नती**

**या विश्वातील ईश्वराला ओळखणे सश्रद्धतेने भारण जाणे एवढेच आपल्या हाती.**
**चिद्घन तू, ही जड मम वाणी**
**सुख तूं ही दुःखाची खाणी,**
**अनंत तू ही सान्तचि गाणी**
**कैशी तव गाऊ ?**

ईश्वराविषयीची ही लीन वृत्ती, त्याच्यावर सर्वस्व सोपविणारी वृत्ती तांब्यांचे बळकट जीवनांग आहे. घातली एकदा अता उडी रे, बुडव लाव वा पैलथडी या निर्धाराने सश्रद्ध तांबे जीवन व्यतीत करू पाहातात. अनय काय कधी हरिही करी ? हा प्रश्न नसून हाच त्यांचा विश्वास आहे. हरिची कारागिरी पाहून

लवव मान मानवा, वृथाभिमान सांडुनी,
अनंत रम्यता पहात लाज रे मनी ,

अशी ठाम शरणागत वृत्ती निर्माण होते. त्यामुळे मृत्यूचे दारूण दुःखही तांब्यांनी बरेचसे सुसह्य करून घेतले आहे. ईश्वरविषयक ताब्यांनी भरपूर कविता लिहिलेल्या आहेत. सांत्वन, अनय काय कधी हरि करी, आईकडे न्या, आले तुझ्या रे दारी नृपा, प्रभु तुज कवणे परि घ्याऊं ? मानसहंसा, अनंतस्रोत, क्षण सुवर्णकण झाले रमणा, या प्रकाशशिखरी, घातली एकदा आता उडी ! उद्याची गती, स्वारी कशी येईल, पहा हो कसा हा कारागीर, पुनः पुनः यावे, तुझे चरण पाहीले अशा अनेक ईश्वरविषयक कविता त्यांनी लिहिल्या असल्याने व ईश्वरविषयक श्रद्धा स्थिर असल्याने ही कविता बव्हंशी एकसुरी उतरलेली आहे. सर्व भिस्त ईश्वरावर असूनही त्याच्या कल्याणकारी आनंददायी रूपाला ते गृहीत धरीत असल्याने त्यांच्या भक्तिभावही क्वचितच उत्कट होतो. भक्तीच्या अनेक अवस्था, छटा त्यांच्या काव्यात नाही. सर्वत्र एकाच पट्टीत तांबे भक्तीला सूर आळवतात. तीव्र जीवनसंघर्ष त्यांना कधी जाणवलाच नाही. तांब्यांचे स्वतःचे वर्तुळ त्याच्या कृपा–सावलीत सुरक्षित होते. आणि समष्टीचा विचार करताना त्यांनी ईश्वराची ही कृपासावली गृहीत धरली होती. भक्तीचे तीव्र सूर जसे या कवितांत नाही तसे गूढगुंजनही नाही. अज्ञाताचे कृपाळू ईश्वर हे रूप अढळपणे स्वीकारल्याने व विश्वातच त्याचा साक्षात्कार गृहीत धरल्याने गूढगुंजनामध्ये आढळणारे अज्ञातचिंतन त्यांच्या कवितेत नाही. त्यांनी काही आरत्या व स्तवनेही लिहिलेली आहेत. ईश्वराचे रूप पाहून कृतकृत्य होण्याची त्याला सर्वस्व अर्पिण्याची इच्छा, त्याच्यासमोर आणवणारे मानवाचे क्षुद्रत्व, असा सर्वसाधारण आशय या ईश्वर कवितांत व्यक्त झालेला आहे. पण आशयाला काव्यरूप क्वचितच लाभलेले दिसते.

तांब्यांनी मधुराभाव व्यक्त करणारी काही गीतेही लिहिलेली आहेत.

**कामातुर जागें तुझ्याविना**
**कानोसा मी घेतां थकलें,**
**तुझी न ऐकूं. येति पाऊले**
**कां मग मजला वेड लाविले ?**
**किती विलंब करिशिल आगमन ?**
**रतलें परपुरुषाशी रे, मी रतले परपुरुषाशी**
**मधुर मुरलिसुर हलवुनि थरथर ओढिती या चरणांशी**
**पैलतिरावर कुंज मनोहर, माझी तेथ मिराशी**
**भिकार सागर गर्जो भेसुर, पुसतें कोण तयाशी ?**

विरह आणि संयोग अशी मधुराभवाची दोन्हीरूपे ताब्यांच्या कवितेत आहेत. परमेश्वर प्राप्तीची ओढ आणि विरहाची तीव्रता उत्कटतेने व्यक्त करण्यात काही विराण्या यशस्वी होतात. निजल्या तान्ह्यावरी कवितेमध्ये तांब्यांनी तान्हा–माउली असा संबंध ईश्वर व भक्तात कल्पिला आहे. विश्वजननीकडे ते असे बालवृत्तीने पाहतात. सान्त्वन कवितेमध्ये आईविना पोरक्या झालेल्या मुलांचा बाप–

**भगवान ! पावती प्राण कसे तरि त्यांचे
जग सोडुनि जाति आई बाप हे ज्यांचे ?**

असे उद्गार काढतो. त्यातील कारुण्य मनाला भिडते.

ईश्वराचे रूपच निसर्गात तांब्यांना दिसले तरी या निसर्गरूपी ईश्वरात मात्र ते फारसे रमताना दिसत नाहींत.

**पहा हो कसा हा कारागीर !
थरारुनी तनू झरे नयनी नीर.
कतरण ही पानिंपानिं रम्य झालरी परी
तरी करान्तरी कुठे नाही कातरी
फुलाफलामध्ये कशा छटा सुरम्य रंगल्या !
ठंद्रचाप रंग हे ! करि न कुंचल्या
मख्मली फुलपाखरुं सुबक हे पहा कुणी,
बुट्या पहा परांवरी, करिं न लेखनी
अगाध नीलिमा वरी, रम्य गोल त्यावरी
सुनेरी रूपेर हे खीळही न करी ?**

असे क्वचित निसर्ग वर्णन येत असले तरी निसर्गरूपात तांबे हरवीत नाहीत. —— तांबे यांची **निसर्गाकडे पाहण्याची वृत्ति मात्र केशवसुत संप्रदायापेक्षा वेगळी होती. तिमिरी आम्ही नित्य रखडणे । विवंचनांचि जिणे कंठणे ? अशी आपली स्थिती असल्याने, किंवा अपूर्ण अपुले ईसिप्त जेथे पूर्ण दिसे झाले. अशा वृत्तीने तांबे निसर्गाकडे वळत नाहीत. दुःखाच्या वेळी निसर्गापेक्षा परमेश्वराकडेच ते वळतात. म्हणून निसर्गाचा बडिवार त्यांनी फारसा चालविला नाही.**[3] हे रा. श्री. जोगांचे उद्गार तांब्यांचा निसर्गविचार नेमक्या शब्दांत मांडतात. झरा प्रभुगात करण्याचा सल्ला देताना दिसतो. या कवितेत प्रकृती, जीवर ईश्वराचे नियंत्रण आहे, अजूनही आपले सौंदर्य अम्लान ठेवून आहे आणि मानव मात्र स्वार्थामुळे विकृत झाला आहे, हा आशय व्यक्त झाला आहे. पण या अम्लान निसर्ग सौंदर्याची मोहिनी खुद्द कवीवरच पडलेली दिसत नाही. सृष्टिवर्णन काव्यमय होत नाही सृष्टीच्या तुलनेत मानवाची विकृती वा कुरूपताही त्यांना जाणवली असली तरी ती त्यांची काव्यप्रेरणाच नाही. बालकवींप्रमाणे निसर्ग आणि स्वार्थी मानव असा ताणही नाही.

**यातुनि कृष्ण मुरलि वाजवितो,
वामन बलीस यांत दडवितो,
यांतुनि नारसिंह गुरगरतो
भ्यारे याते,**

निसर्गातील ईश्वराचे प्रकटीकरण असे जाणवूनही त्याच्या निसर्गरूपाकडे ते फारसे आकर्षिल्या जात नाहीत. ताब्याना आनंददायी जीवनदृष्टीतून पुरेशा जीवनप्रेरणा प्राप्त होत असल्याने त्यांना त्यासाठी निसर्गाकडे वळावेसे वाटत नाही. गुराखी जसा निसर्ग सान्निध्यात देवाजी वरि सदा हवाला ठेवून निर्धास्त राहतो तसे निसर्ग सान्निध्य अपरिहार्य न मानणारे कवी तांबेही. सौंदर्य हा ईश्वराचा विशेष असल्याने निसर्गात त्याचा साक्षात्कार होताच त्याला अलौकिक मानून तांबे त्यासमोर लीन होतात. काळेभोर विशाल कसे या कवितेत एका सुंदरीचे मनोरम वर्णन केल्यानंतर कवी पापाची स्मृती राहिली जर नरा पाहुनि ही सुंदरी धिग्धिक । त्या कळली अगाध हरिची नाहीच कारागिरी । असे निसर्गसौंदर्याप्रमाणे, स्त्रीसौंदर्यही लौकिक पातळीवर ठेवायला तयार नाही.

**महाप्रस्थान गीते –**

तांब्यांच्या प्रस्थान गीतांमध्ये मृत्युचिंतन असले तरी आत्म्याच्या अमरत्वाला ठामपणे पुरस्कारणा–या परंपरेमुळे तसेच ईश्वराकडे वास करण्याची वा मोक्षादी कल्पनांमुळे त्यांचे मृत्युचिंतन भय व्याकुळ नाही. मरण त्यांना चिरंजीवपणाचे, अमरपणाचे व्दार वाटते. गीतेमध्ये आत्मा, मनुष्याने वस्त्रे बदलावीत, तशी शरीरे बदलवितो, असा विचार आहे. गाडी बदलण्याचा विचार त्यालाच अनुसरतो....

**गाडी बदलली यांत कशाचे भय संकट खेद ?**
**कां मग मरणा भ्यावे न कळे रटोनिया वेद**

देहगौणच. उलट भोगासक्त म्हणून वारंवार सुखदुःखाने अस्वस्थ होणारा. त्यात नाशवंत. देहभाव प्रबळ ठरणे आध्यात्मिक साधकाला नेहमी संकटप्रायच असते त्यामुळे देहबंधन सोडविणारा आत्मा मुक्त करून परमात्मयामध्ये स्थिर करणारा मृत्यू जणू उपकारकर्ताच ठरतो. म्हणूनच मृत्युदूताला तांबे हरीचे दूत समजतात व मृत्यूला महाप्रस्थान वा पूर्णाहूती.

**कोणी आणूं नका आसवें लोचनी,**
**छे । न ही शून्यता । पूर्णता, सदगती ।**

अपरविश्वाचे व्दार म्हणजे मृत्यू म्हणून कवी त्याच्या स्वागताला सहजच सिद्ध होऊ पाहतो.

**रामकृष्णही आले गेले !**
**त्याविण जग का ओसचि पडले ?**
**कुणी सदोदीत सूतक धरिले ?**
**मग काय अटकले मजशिवाय ?**
**अशा जगास्तव काय कुढावें ।**
**मीहि कुणाच्या कां गुंतावे ?**
**हरिदूता का विन्मुख व्हावे ?**
**का जिरवु नये शान्तींत काय ?**

**मरणांत खरोखर जग जगते**
**आधी मरण, अमरपण ये मग ते**
**अनंत मरणें अधी मरावी,**
**मारिल मरणचि मरणा भावी,**
**मग चिरंजीवपण ये बघ ते :**

**जाते ! मज आता**
**मंगलाचे धाम**
**मूर्त जगत्प्रेम**
**बोलाविते**

अशी मरणाच्या स्वागताची सर्व तयारी कवी करीत असला तरी जीवनासक्ती टळत नाहीच. नववधू प्रिया मी बावरते मध्ये जीवनासक्ती आणि मौल्यवान मरण यातील ताण उत्कटतेने व्यक्त होतो. सासरी जाणा–या मुलीला जसे बापाचे घर सोडवत तशीच मरणा–याला जीवनासक्ती.

VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

**मला येथला लागला लळा.**
**सासरि निघतां दाटतो गळा,**
**बागबगीचा, येथला मळा**
**सोडीतां कसे मन चरचरते**

प्रस्तुत अप्रस्तुताच्या बेमालुम गुंफणीमुळे ही कविता कमालीची मनोज्ञ झाली असून केवळ त्यांच्या महाप्रस्थान गीतांतच नाही तर सर्व कवितांत अग्रस्थानी ठरलेली आहे. मृत्यूचे स्मित वदनाने एकीकडे स्वागत करताना दुसरीकडे जीवनाचा तपशील हटकून त्यांच्या मनात गर्दी करी. हा संघर्ष उत्कटपणे त्यांच्या सर्वच महाप्रस्थान गीतांत प्रकटत नाही. जीवनाची आसक्ती एवढी प्रबळ की त्यापासून मुक्त होणे जिवासाठी दुरापास्तच म्हणूनच नवरीला सासरी नेण्याची जबाबदारी ज्याप्रमाणे वराची त्याचप्रमाणे ख–या घरी जिवाला नेण्याची जबाबदारी ही कवीने हरीवरच सोपविली आहे.

**तू बोलविता परि थरथरते**
**अता तूंच भयलाज हरी हे !**
**धीर देउनी ने नवरी रे !**
**भरोत भरतिल नेत्र जरी रे !**
**कळ पळभर मात्र खरें घर तें**

नववधूचे हे रूपक असे अर्थपूर्ण बनलेले आहे. मृत्यूची अटळता, सत्यताच नव्हे तर त्याचे श्रेष्ठत्व पटवून देताना जिवाची घालमेल होते. ती नववधू —— मध्ये जशी काव्यपातळी गाठते. तशी इतरत्र क्वचितच गाठताना तपशील डोईजड झाल्याने भव्योदात्त परिणाम निर्मितीमध्ये ही कविता अपयशी ठरते नववधू प्रिया मी, निरोप घेताना, मरणांत खरोखर जग जगते, गाडी बदलली, पूर्णाहुति या सारख्या अनेक कवितांत मृत्यूला सहजपणे स्वीकारण्यासाठी आपल्या मनाची सिद्धता करण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न प्रत्यक्षात यशस्वी ठरला. अंतिम समयी त्यांच्या मुलाने डॉक्टर बदलविण्याची इच्छा प्रकट करताच Dear Madhu, I shall quietly pass away to night[4] असे उद्‌गार तांबे काढू शकले.

मृत्यूची अपरिहार्यता मनाला पटवून देणारे युक्तिवाद भावननिक संघर्ष सुचवीत नाहीत. त्यामुळे त्यांचे मुत्यूचिंतन वैचारिक पातळीवर बव्हंशी थबकते. यामुळेच महाप्रस्थान गीतांनाही मर्यादा येते. मृत्यूचे दाहक स्वरूप या कवितांतून कुठेही जाणवत नाही. गोविंदाग्रज, बालकवी प्रमाणे मृत्यूमुळे कवीच्या वाट्याला भय व्याकुळता येत नाही. पारंपरिक विचारांमुळे हे मृत्युचिंतन मर्यादित झालेले वाटत असले तरी तांब्यांच्या जीवननिष्ठेशी ते सुसंगत होते. जीवनाप्रमाणे मरणालाही ईश्वरेच्छा मानून स्वीकारणे, हीच त्यांची जीवनदृष्टी होती.

**संदर्भ :–**


1. कृ. ब. निकुम्ब, पारख, मॅजेस्टिक प्रकाशन, द्वितीयावृत्ती ऑक्टो.–1989 पृ.129.
2. कित्ता, पृ.130.
3. संपा– रा.श्री. जोग, प्रस्तावना, भास्कर रामचंद्र तांबे यांची समग्र कविता, व्हीनस प्रकाशन, आवृत्ती नववी, सप्टें.1995, पृ.26.
4. कृ. ब. निकुम्ब, पारख, उनि, पृ. 137.